मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# प्रभाग 12 (रुपीनगर-त्रिवेणीनगर) राजकीय तापमान शिगेला:

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष विरुद्ध भारतीय जनता पक्ष यांच्यात थेट सामना!




निवडणुकीचा रणसंग्राम

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, प्रभाग १२ (रुपीनगर-त्रिवेणीनगर) मध्ये राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या प्रभागात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (आणि भारतीय जनता पक्ष यांच्यात कांटे की टक्कर होण्याची स्पष्ट चिन्हे दिसत आहेत, ज्यामुळे यंदाची लढत अत्यंत निर्णायक ठरणार आहे. इच्छुकांच्या नावांमुळे आणि झालेल्या भौगोलिक बदलांमुळे येथील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलून गेली आहेत.

**भाजपची संभाव्य उमेदवारी: प्रमुख नावे आणि प्राधान्यक्रम**

भाजपच्या गोटातून अनेक सक्षम नावांची चर्चा आहे, ज्यामध्ये खालील प्रमुख नावे अग्रस्थानी आहेत:

शांताराम बापू भालेकर
शीतल धनंजय वर्णेकर
अस्मिता अनिल भालेकर
शांताराम दगडू भालेकर
अमोल तुकाराम भालेकर
नीलेश भालेकर

संभाव्य प्राधान्य: राजकीय विश्लेषकांच्या मते, या यादीतून शांताराम बापू भालेकर आणि शीतल वर्णेकर यांना उमेदवारी मिळण्याची अधिक शक्यता आहे. अजून दोन उमेदवार निश्चित होणे बाकी आहे. भाजप हा प्रभाग जिंकण्यासाठी आपली संपूर्ण ताकद पणाला लावेल.

**राष्ट्रवादी काँग्रेस: गड राखण्याचे आव्हान आणि अंतर्गत कलह**

विद्यमान नगरसेवकामुळे राष्ट्रवादी काँग्रेससाठी हा प्रभाग महत्त्वाचा आहे. इच्छुकांमध्ये मोठी गर्दी असून, प्रमुख नावे खालीलप्रमाणे आहेत:

पंकज भालेकर (विद्यमान नगरसेवक)
रविंद्र अप्पा सोनवणे (नगरसेविका स्व. पौर्णिमा सोनवणे यांचे पती)
प्रविण भालेकर (विद्यमान नगरसेवक)
शरद भालेकर आणि सारिका भालेकर
शीतल राहूल पवार
धनंजय भालेकर व सीमा भालेकर

यासह राहुल पवार हे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट, दादासाहेब सुखदेव नरळे आणि आशा दयानंद भालेकर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट, संदीप जाधव शिवसेना शिंदे गटाकडून इच्छुक आहेत.

**मध्यवर्ती भूमिका:**

या निवडणुकीत प्रवीण भालेकर यांची भूमिका मध्यवर्ती राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये असलेला अंतर्गत कलह भाजपला फायदा मिळवून देतो की राष्ट्रवादी पक्ष आपला मजबूत गड टिकवून ठेवतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**भौगोलिक बदलांमुळे समीकरणांमध्ये मोठी उलथापालथ**

राजकीय समीकरणात सर्वाधिक उलथापालथ झाली ती ताम्हाणेवस्ती आणि त्रिवेणीनगरचा काही भाग प्रभाग १ ला जोडल्यामुळे. या निर्णयामुळे प्रभाग १२ च्या मतदारांच्या गणितावर थेट परिणाम झाला आहे.

प्रभाग बदलाचा परिणाम: या बदलामुळे संगीता ताम्हाणे आणि सुरेश म्हेत्रे हे आता प्रभाग १२ ऐवजी प्रभाग १ मध्ये स्पर्धेसाठी नावनोंदणी करण्याचा विचार करत असल्याची जोरदार चर्चा आहे.

### राजकीय विश्लेषकांचे मत: व्यापक प्रभाव असलेली लढत

» स्थानिक राजकीय विश्लेषकांच्या मते, रुपीनगर-त्रिवेणीनगरमधील ही निवडणूक फक्त एका प्रभागाची नसून, ती आगामी महापालिका निवडणुकीच्या व्यापक समीकरणांवर प्रभाव टाकणारी ठरू शकते. यंदाच्या निवडणुकीत खालील दोन घटक निर्णायक ठरणार आहेत: मतदारांचा मूड: महागाई, स्थानिक विकासकामे आणि नेतृत्वाचा चेहरा यावर मतदारांचा कल स्पष्ट होईल.

### युतीचे गणित:

» दोन्ही पक्षांनी इतर छोट्या गटांसोबत केलेल्या युत्या किंवा आघाडीचे निर्णय अंतिम निकाल ठरवतील.राजकीय समीकरणे बदलल्यामुळे, ही निवडणूक कोणत्याही एका पक्षासाठी सोपी नसेल आणि दोन्ही पक्षांना आपले राजकीय वजन पणाला लावावे लागणार आहे.

# नवले पुलावरील अपघातात चिमुरडीचा दुर्दैवी अंत

## तीन वाहनांचा विचित्र अपघात; पाच जणांचा मृत्यू, 20 जण गंभीर जखमी






**पिंपरी | प्रतिनीधी**

नवले पुलावर काल भीषण अपघात झाला. साताऱ्याहून कात्रजच्या दिशेने येणाऱ्या कंटेनरचा ब्रेक फेल होऊन नियंत्रण सुटले. आणि तो कंटेनरने समोरच्या १०-१५ वाहनांना जोरदार धडक दिली. या दुर्घटनेत एक ट्रॅव्हलर बस पलटी झाली आणि त्यामध्ये १८-२० प्रवासी होते. कंटेनरच्या डिझेल टँकला आग लागल्याने आणि सीएनजी कारच्या स्फोटामुळे या अपघाताने मोठे भयावह रूप धारण केले. अपघातात आठ जणांचा होरपळून मृत्यू झाला असून, त्यात मोशी येथील पॅराडाईज वन सोसायटी येथील हेमंतकुमार रेड्डी यांची ३ वर्षांच्या कु. मोक्षिता हिचा दुर्दैवी मृत्यू झाला. तसेच यात २२ लोक जखमी झाले आहेत.

या दुर्घटनेमुळे रहदारीचा मार्ग बंद झाला आणि पोलिस व अग्निशमन दलाने ताबडतोब घटनास्थळी पोहोचून मदत केली. पोलिसांनी कंटेनर चालक, मालक आणि क्लीनर यांच्या विरोधात गुन्हा नोंदविला आहे. या घटनेने रेड्डी कुटुंबीयांवर शोककळा पसरली असून मोशीकरांनी याविषयी हळहळ व्यक्त केली आहे.

# विक्रांत पाठोपाठ अमित पठारे पोलिसांच्या ताब्यात

## नितीन गिलबिले हत्येतील आरोपी विक्रांत ठाकूर पाठोपाठ अमित पठारे पोलिसांच्या ताब्यात

**पिंपरी | प्रतिनिधी**

नितीन गिलबिले हत्येप्रकरणी अमित पठारेला देखील पिंपरी-चिंचवड पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. विक्रांत ठाकूर आणि अमित पठारेला ताब्यात घेतल्याने नीतीनच्या हत्येच कारण समोर येणार आहे.

दोन दिवसांपूर्वी नितीन गिलबिलेची वडमुखवडी अलंकापुरम रोड लगत फॉर्च्युनर गाडीत पिस्तूलातून गोळ्या घालून हत्या केली होती. हत्येनंतर आरोपी अमित पठारे आणि विक्रांत ठाकूर दोघेही पसार झाले होते. अखेर त्यांना पिंपरी- चिंचवड पोलिसांनी ताब्यात घेतल आहे. विक्रम ठाकूरला लोणावळा आणि अमित पठारेला वाघोलीतून ताब्यात घेण्यात आल आहे. प्लॉटींग आणि संपत्तीच्या वादातून हत्या केल्याचं प्रथमदर्शनी पोलिसांकडून सांगण्यात आलं आहे. आता दोघांना ताब्यात घेतल्यानंतर नितीन गिलबिलेच्या हत्येच गूढ समोर येईल. नेमकं कारण समोर येईल.

पिंपरी-चिंचवड पोलीस दोघांकडे कसून चौकशी करत आहेत. पोलीस उपायुक्त शिवाजी पवार, मारुती जगताप, सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल हिरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचारी स्वप्नील लांडगे, योगेश नागरगोजे, सुधीर डोळस, नितीन लवटे यांच्या टीमने ही कारवाई केली आहे.





# ताथवडे येथील पशुसंवर्धन विभागाची 15 एकर शासकीय जमीन बिनबोभाट लाटली!

## सहाय्यक दुय्यम निबंधकांचे निलंबन, सरकारला अंधारात ठेवून जमिनीची परस्पर विक्री

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड परिसरातील ताथवडे येथील पशुसंवर्धन विभागाची 15 एकर शासकीय जमीन बेकायदेशीरपणे विक्री झाल्याचा मोठा प्रकार उघडकीस आला आहे.या प्रकरणात पशुसंवर्धन विभागाने पोलिसांकडे तक्रार दाखल केली असून, या घोटाळ्यात 22 वारस तसेच खरेदीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान यामध्ये सहाय्यक दुय्यम निबंधकांचे निलंबन करण्यात आले आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हे निलंबनाचे आदेश दिले आहेत.

पुण्यातील मुंढवा येथील मूळची महार वतनाची आणि सध्या सरकारच्या ताब्यात असलेली ४० एकर जागा जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी न घेता तसंच मुद्रांक शुल्क बुडवून परस्पर विकल्याचं प्रकरण ताजे असतानाच पुणे जिल्ह्यातील आणखी एका सरकारी जमिनीचा घोटाळा समोर आल्यानं खळबळ उडाली आहे. ही जमीनही सरकारला अंधारात ठेवून त्यांची परस्पर विक्री झाल्याचा प्रकार घडला आहे.




ताथवडे इथली १५ एकर जमिनीची बेकायदा विक्री झाल्याची तक्रार पशुसंवर्धन खात्यानं पुणे विभागीय आयुक्तांकडं केली आहे.

या विक्री प्रकरणात निबंधक कार्यालयातील गंभीर अनियमितता उघड झाल्याने सहाय्यक दुय्यम निबंधक विद्या बडे या महिला कर्मचाऱ्याला निलंबित करण्यात आले आहे. हवेली क्रमांक 17 येथील निबंधक कार्यालयात दस्त क्र. 685/2025 या खरेदीखताच्या नोंदणीदरम्यान अनेक त्रुटी आढळल्या. दस्त नोंदणी करताना अद्ययावत सातबारा न जोडता जुना सातबारा उतारा स्वीकारण्यात आला. यामुळे जमीन पशुसंवर्धन विभागाच्या ताब्यात असल्याची आणि विक्रीवर बंदी असल्याची नोंद दुर्लक्षित झाली.याशिवाय संबंधित कर्मचाऱ्याने भोगवटादार हेरंब गुपचूप आणि वारसांची नोंद आणि इतर अधिकारात असलेल्या नोंदी 'स्किप' करून दस्त नोंदणी पूर्ण केली. या निष्काळजीपणामुळे कोट्यवधींच्या शासकीय जमिनीची बेकायदेशीर विक्री नोंदवली गेली.

### अकरा महिन्यांपूर्वी जमिनीची विक्री

पिंपरी-चिंचवड भागातील ताथवडे येथील राज्य सरकारच्या पशुसंवर्धन खात्याच्या मालकीची १५ एकर जमीन खात्याला अंधारातून ठेवून परस्पर विकली गेली आहे. या व्यवहाराची कागदपत्रे देखील तयार करण्यात आली आहेत. अकरा महिन्यांपूर्वी हा बेकायदा जमीन विक्रीचा प्रकार घडला आहे. विक्री व्यवहाराचा दस्त झाल्याची माहिती पशुसंवर्धन खात्याला मिळाल्यानंतर खात्यानं विभागीय आयुक्तांकडे तक्रार केली. तक्रार आल्यानंतर विभागीय आयुक्तांनी नोंदणी व मुद्रांक विभागाला याबद्दल विचारणा केली, त्यानंतर खरोखरच हा बेकायदा विक्रीचा धक्कादायक व्यवहार समोर आला.

### बिनबोभाट व्यवहार

» ताथवडे येथे पशुसंवर्धन खात्याची ७२ हेक्टर (सुमारे १७८ एकर) जागा आहे. त्यातील एका गटातील पंधरा एकर जागेवर पशुसंवर्धन खात्याचे नाव इतर अधिकारात आहे. त्यामुळं खात्याच्या परवानगीशिवाय जमिनीचा व्यवहार करता येत नाही. तरीही जानेवारीमध्ये या व्यवहाराला सुरुवात झाल्याचे समोर आलं आहे. संबंधित जागा हेरंब गुपचूप यांच्या खासगी मालकीची असली, तरी इतर अधिकारात पशुसंवर्धन खात्याची नोंद आहे. या जागेसंदर्भात हायकोर्टात मालकाने दावा दाखल केला होता. त्या दाव्याच्या निकालात कोर्टानं मालकीसंदर्भात कोणतेही भाष्य केलेलं नाही. त्यामुळं सातबारा उताऱ्यावर इतर अधिकारात पशुसंवर्धन खात्याचं नाव कायम राहिलं. तरीही जानेवारी २०२५ मध्ये गुपचूप यांनी या जागेचा विक्रीचा व्यवहार केला. या व्यवहारापोटी सरकारला कुठलीही माहिती न देता कोट्यवधी रुपयांचा व्यवहार झाला.

### सहाय्यक दुय्यम बडे निलंबित!

» पुण्यात मुंढव्यातील ४० एकर आणि बोपोडीतील १३ एकर सरकारी जमिनींचा व्यवहार गाजत असतानाच ताथवडेतील हा तिसरा १५ एकर सरकारी जमीन विक्रीचा बेकायदा प्रकार उघडकीस आला आहे. दरम्यान, या प्रकरणी सहाय्यक दुय्यम निबंधक विद्या बडे यांचं निलंबन करण्यात आलं आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हे निलंबनाचे आदेश दिले आहेत. त्यांची चौकशी सुरू आहे. निलंबनाच्या काळात त्यांना मुख्यालय मुंबई येथे राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या काळात कोणतीही खाजगी नोकरी किंवा व्यवसाय करण्यास मनाई असून, नियमांचे उल्लंघन केल्यास पुढील कारवाई केली जाणार आहे असे आदेशात म्हटले आहे.

# हिंजवडी आयटी पार्कचे रूप पालटणार! 'एमआयडीसी'चा 'ॲक्शन प्लॅन'

## आयटी पार्कमधील रस्ते खड्डेमुक्त करण्याची मोहीम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) हाती घेतली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कमधील खड्डेमय रस्ते, सातत्याने होणारी वाहतूक कोंडी हे चित्र आता बदलणार आहे. आयटी पार्कमधील रस्ते खड्डेमुक्त करण्याची मोहीम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) हाती घेतली आहे. याचबरोबर वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी हिंजवडी ते बाणेर या रस्त्याच्या कामाला गती देण्यात आली आहे.

बाणेरमधून माण, म्हाळुंगेमार्गे हिंजवडी आयटी पार्कमधील टप्पा एक व टप्पा तीनला जोडणारा रस्ता गेल्या सहा वर्षांपासून रखडला आहे. या परिसरातील पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची माण- म्हाळुंगे नगर नियोजन (टीपी) योजना प्रलंबित आहे. पीएमआरडीएचा विकास आराखडा रद्द झाल्याने ही टीपी योजना कधी होणार, याबद्दल प्रश्नचिन्ह आहे. हिंजवडी ते बाणेर हा सहा पदरी रस्ता प्रस्तावित असून, त्याची लांबी ६ किलोमीटर आहे. त्यातील अडीच किलोमीटरचे काम पूर्ण असून, साडेतीन किलोमीटर रस्त्याचे काम प्रलंबित आहे.




### खड्डे बुजवून डांबरीकरण

» आयटी पार्कमधील खड्डेमय रस्त्यांवरून सातत्याने टीका केली जात आहे. आता एमआयडीसीकडून खड्डे बुजविण्याचे काम सुरू आहे. खड्डे बुजवून त्या ठिकाणी डांबरीकरण करून रस्ता व्यवस्थित केला जात आहे. आयटी पार्कमध्ये पांडवनगर चौक, लक्ष्मी चौक, मेगापोलीस सर्कल, शिवाजी चौक आणि टी जंक्शन या भागातील १० हजार चौरस मीटरच्या रस्त्याची दुरुस्ती करून डांबरीकरण करण्यात आले आहे.

हिंजवडी ते बाणेर रस्त्याचे एमआयडीसी सर्कल ते माण गावापर्यंतचे १.८ किलोमीटरचे काम एमआयडीसीकडून येत्या दोन आठवड्यांत पूर्ण करण्यात येणार आहे. या रस्त्याच्या बाणेरच्या बाजूचे काम १.६ किलोमीटरचे काम भूसंपादनाअभावी पूर्ण झालेले नाही. एमआयडीसी सर्कल ते माण गावापर्यंतच्या रस्त्यांची रुंदी ८.५ मीटर आहे. हा रस्ता सहा पदरी प्रस्तावित असला तरी केवळ तीन पदरी रस्त्याएवढी जागा सध्या उपलब्ध आहे. रस्ता रुंदीकरणाला काही जागा मालकांनी आक्षेप घेऊन उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

त्यामुळे सद्य:स्थितीत उपलब्ध असलेल्या ८.५ मीटर रुंदीच्या रस्त्याची खड्डे दुरुस्ती आणि डांबरीकरण केले जाणार आहे. हा रस्ता पुढे माण गावातून बाणेरमध्ये राष्ट्रीय महामार्गाला जोडला जातो. या रस्त्यामुळे बाणेरमधून म्हाळुंगेमार्गे आयटी पार्क टप्पा एक व तीनमध्ये जलद पोहोचणे शक्य होणार आहे.

एमआयडीसीकडून खड्डे बुजविण्याचे काम सुरू आहे. खड्डे बुजवून त्या ठिकाणी डांबरीकरण करून रस्ता व्यवस्थित केला जात आहे. आयटी पार्कमध्ये पांडवनगर चौक, लक्ष्मी चौक, मेगापोलीस सर्कल, शिवाजी चौक आणि टी जंक्शन या भागातील १० हजार चौरस मीटरच्या रस्त्याची दुरुस्ती करून डांबरीकरण करण्यात आले आहे. आयटी पार्कमधील रस्ते खड्डेमुक्त करण्याची मोहीम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) हाती घेतली आहे. याचबरोबर वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी हिंजवडी ते बाणेर या रस्त्याच्या कामाला गती देण्यात आली आहे.

### रुंदीकरणाला काही जागा मालकांनी आक्षेप

» हिंजवडी ते बाणेर रस्त्याचे एमआयडीसी सर्कल ते माण गावापर्यंतचे १.८ किलोमीटरचे काम एमआयडीसीकडून येत्या दोन आठवड्यांत पूर्ण करण्यात येणार आहे. या रस्त्याच्या बाणेरच्या बाजूचे काम १.६ किलोमीटरचे काम भूसंपादनाअभावी पूर्ण झालेले नाही. एमआयडीसी सर्कल ते माण गावापर्यंतच्या रस्त्यांची रुंदी ८.५ मीटर आहे. हा रस्ता सहा पदरी प्रस्तावित असला तरी केवळ तीन पदरी रस्त्याएवढी जागा सध्या उपलब्ध आहे. रस्ता रुंदीकरणाला काही जागा मालकांनी आक्षेप घेऊन उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

> आयटी पार्कमध्ये रस्त्यांवरील खड्डे दुरुस्त करण्याचे काम तातडीने पूर्ण केले जाणार आहे. याचबरोबर वाहतूक कोंडी होणाऱ्या ठिकाणी रस्त्यांचे रुंदीकरण केले जाणार आहे. तसेच, हिंजवडी ते बाणेर रस्त्याचे कामही लवकरात लवकर पूर्ण केले जाईल.
> - राजेंद्र तोतला, कार्यकारी अभियंता, एमआयडीसी

# चांदणी चौक–बावधन मार्गावरील तीव्र उतार कमी करून अपघातप्रवण क्षेत्र कमी करणार

## अपघातप्रवण क्षेत्र कमी करण्याचे नियोजन पुणे महापालिकेने हाती घेतले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

चांदणी चौक–बावधन मार्गावरील तीव्र उतार कमी करून अपघातप्रवण क्षेत्र कमी करण्याचे नियोजन पुणे महापालिकेने हाती घेतले आहे. या रस्त्यावर अनेकदा अपघात घडल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हे काम तातडीने करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे या परिसरातील वाहतूक सुरळीत होऊन रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण कमी होण्याची शक्यता आहे.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, पथ विभागाचे अधीक्षक अभियंता अभिजित आंबेकर आणि उपअभियंता सुनील भोंगळे यांनी गुरुवारी चांदणी चौक आणि बावधन परिसरातील रस्त्यांची पाहणी केली. या पाहणीदरम्यान बावधन खुर्द येथील गल्ली क्रमांक एक, सर्व्हे क्रमांक २० मधील तीव्र उतार असलेल्या रस्त्याची तपासणी करण्यात आली. संबंधित रस्ता योग्य तांत्रिक पातळीवर विकसित करून त्याचा उतार कमी करण्याचे आदेश दिवटे यांनी दिले.




सध्या या रस्त्याचा उतार जास्त असल्यामुळे वाहनांना ब्रेकिंग आणि नियंत्रण ठेवण्यास अडचण येते, परिणामी लहानमोठे अपघात घडतात. या पार्श्वभूमीवर महापालिका आता रस्त्याची रचना बदलून त्याचा उतार कमी करणार आहे. त्याचबरोबर रस्त्याच्या रुंदीमध्ये सुधारणा करून वाहतूक सुलभ करण्यावर भर दिला जाणार आहे.

### समस्येवर कायमस्वरूपी तोडगा

» अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे म्हणाले, "बावधन परिसरात तीव्र उतार असलेल्या रस्त्यामुळे अपघातांच्या घटना वाढल्या आहेत. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी रस्ता पूर्ण रुंदीने विकसित करून त्याचा उतार तांत्रिकदृष्ट्या समतोल केला जाणार आहे. आवश्यक जमीन ताब्यात घेऊन सुधारणा कामे लवकर सुरू होतील."

अधिकाऱ्यांनी या रस्त्याला जोडल्या जाणाऱ्या अन्य रस्त्यांचीही पाहणी केली. उर्वरित जागांचा ताबा लवकर घेऊन रस्त्यावरील सुधारणा कामाला वेग देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे या भागातील अपघातप्रवण ठिकाणे कमी होतील, असे महापालिकेचे म्हणणे आहे.

हा रस्ता विकसित झाल्यास बावधन परिसरातून थेट महामार्गापर्यंत पोहोचण्यासाठी नवा लिंक रोड तयार होईल. त्यामुळे नागरिकांना वाहतुकीसाठी सुरक्षित आणि सोयीस्कर मार्ग उपलब्ध होईल. या भागात वाढत्या वसाहती आणि वाहतुकीच्या ताणामुळे रस्त्याची सुधारणा अत्यावश्यक ठरली आहे.

# अजित पवारांनी मुलाखती घेतल्या, पण नाव गुलदस्त्यातच

## बारामती नगराध्यक्षपदाचा सस्पेन्स कायम, आयोजित मेळाव्यात कोणाचेही नाव जाहीर केले नाही

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती नगर परिषद नगराध्यक्ष पदासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुलाखती घेतल्या मात्र त्यानंतर आयोजित मेळाव्यात कोणाचेही नाव जाहीर केले नाही त्यामुळे नगराध्यक्ष पदाचा सस्पेन्स कायम राहिला . लवकरच नाव जाहीर करू असे अजित पवार यांनी स्पष्ट केले. अंतर्गत बंडाळी टाळण्यासाठी अजित पवार यांनी नाव जाहीर केले नाही अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली.

शहरातील राष्ट्रवादी भवन येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादीकडून बारामती नगरपरिषद माळेगाव नगरपंचायत निवडणुकीत नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. त्यानंतर आयोजित मेळाव्यात अजित पवार बोलत होते. यापूर्वी आयोजित पत्रकार परिषदेत आपण गुरुवारच्या मुलाखतीनंतर नाव जाहीर करणार असल्याचे पवार यांनी स्पष्ट केले होते.

त्यामुळे आज बारामती नगरपरिषदेचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार ठरणार, अशी शक्यता राजकीय वर्तुळात वर्तवली जात होती. मात्र, मुलाखतीनंतर पवार यांनी कोणाचीही नाव नगराध्यक्ष पदासाठी जाहीर केले नाही. दोन-तीन दिवसांत नाव जाहीर केले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. उमेदवार कोणीही असला तरी अजित पवार यांची राष्ट्रवादी व घड्याळ डोळ्यासमोर ठेवून कामाला लागण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी कार्यकर्त्यांना दिल्या.

गट, तट, भावकी अंतर्गत हेवेदावे बाजूला ठेवा. एकदिलाने सर्वजण एकत्र येऊन काम करा. नगराध्यक्ष पदाचा चेहरा सर्व समावेश असेल. गेली ३५ वर्षे आपण राजकारणात आहोत त्यामुळे कोणता नगराध्यक्ष द्यायचा हे मला चांगलंच कळतं असे अजित पवार यावेळी म्हणाले. बारामती नगरपरिषद तसेच माळेगाव नगरपंचायत नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी इच्छुक उमेदवारांनी आज राष्ट्रवादी भवन येथे मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

सर्वांना संधी देणे शक्य नाही. मुलाखती दरम्यान आलेले अनुभव त्यांनी मेळाव्यात सांगितले. बारामती नगर परिषद नगराध्यक्षपदासाठी इच्छुक उमेदवारांना त्यांनी बारामती शहरासाठी तुमचे व्हिजन काय, गेल्या दहा वर्षात बारामती नगर परिषदेच्या माध्यमातून किती विकासकामे झाली, बारामती नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांची संख्या, अशा प्रश्नांची सरबत्ती केली.



### वीस प्रभागातील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती

**» अजित पवार यांनी बारामती नगर परिषदेच्या वीस प्रभागातील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. माळेगाव नगरपंचायतीच्या सत्र प्रभागातील इच्छुकांच्या देखील त्यांनी मुलाखती घेतल्या. सर्वांना संधी देणे शक्य नाही. मुलाखती दरम्यान आलेले अनुभव त्यांनी मेळाव्यात सांगितले. बारामती नगर परिषद नगराध्यक्षपदासाठी इच्छुक उमेदवारांना त्यांनी बारामती शहरासाठी तुमचे व्हिजन काय, गेल्या दहा वर्षात बारामती नगर परिषदेच्या माध्यमातून किती विकासकामे झाली, बारामती नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांची संख्या, अशा प्रश्नांची सरबत्ती केली.**

### ३३०० कोटींची विकासकामे..

**» यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गेल्या दहा वर्षात बारामती शहरातील विकासकामांचा आढावा घेतला. बारामती नगर परिषदेचे उत्पन्न ३२५ कोटी रुपये एवढे जमा झाले. मात्र शहरात ३ हजार ३०० कोटी रुपयांची विकास कामे झाले आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी विकास कामांना मिळवून दिल्याचे अजित पवार यांनी स्पष्ट केले.**

### माळेगाव रोड मॉडेल करू..

**» माळेगाव नगरपंचायतीसाठी देखील गेल्या पाच वर्षात जवळपास 350 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असल्याचे अजित पवार यांनी यावेळी स्पष्ट केले. माळेगावची नगरपंचायत आपल्या ताब्यात दिल्यास रोड मॉडेल अशी माळेगाव नगरपंचायत बनवून दाखवतो असेही अजित पवार यावेळी म्हणाले. माळेगावच्या गट, तट गावठी भावकीवर देखील अजित पवार बोलले.**

# सकल मराठा समाजाच्या पाठिंब्याने भोरमध्ये भाजपची ताकद वाढली

## सकल मराठा समाजाचे भोर तालुका अध्यक्ष संजय भाऊसाहेब भेलके (पाटील) यांनी आपल्या प्रमुख सहकाऱ्यांसह भारतीय जनता पक्षामध्ये अधिकृत प्रवेश केला.

**पुणे | प्रतिनिधी**

भोर तालुक्यातील राजकीय समीकरणात महत्त्वाची हालचाल झाली आहे. सकल मराठा समाजाचे भोर तालुका अध्यक्ष संजय भाऊसाहेब भेलके (पाटील) यांनी आपल्या प्रमुख सहकाऱ्यांसह भारतीय जनता पक्षामध्ये अधिकृत प्रवेश केला. त्यांच्या या निर्णयामुळे तालुक्यात भाजपची ताकद लक्षणीय वाढल्याचे राजकीय विश्लेषक मानत आहेत.

संजय भाऊसाहेब भेलके (पाटील) यांच्यासोबत दिलीप किसन भेलके, सुरज राजेंद्र भेलके, सुनील भाऊसाहेब खाटपे, सयाजीराव पाटील आणि पार्थ संजय भेलके यांनी देखील भाजपचा झेंडा हातात घेतला. पक्षात प्रवेश करताच उपस्थित पदाधिकाऱ्यांनी त्यांचे जोरदार स्वागत केले.माजी आमदार संग्राम थोपटे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा प्रवेश सोहळा संपन्न झाला, यावेळी सोबत युवा नेते पृथ्वीराज थोपटे, उद्योजक विक्रम चव्हाण, राजगड सहकारी साखर कारखान्याचे संचालक उत्तमराव थोपटे,

सुभाषराव कोंढाळकर, माजी उपनगराध्यक्ष चंद्रकांत अण्णा मळेकर, सामाजिक कार्यकर्ते बजरंग आबा शिंदे, विश्वजीत चव्हाण, रवि कंक, भाजप जिल्हा युवा मोर्चाचे सरचिटणीस अमर बुदगुडे आदी मान्यवर उपस्थित होते.तसेच याप्रसंगी आप्पा मळेकर, महेश भेलके,अभिदादा भेलके, जितेंद्र कंक, दीपक मांढरे, इंद्रजित सुपेकर आणि इतर कार्यकर्तेही सहभागी झाले होते. कार्यक्रमस्थळावर जयघोष, टाळ्यांचा कडकडाट आणि उत्साहाचं वातावरण होते.

यावेळी संजय भेलके म्हणाले की, भाजपच्या विकासाभिमुख धोरणांवर विश्वास ठेवून समाजहितासाठी काम करण्याचा निर्धार त्यांनी केला आहे. संग्राम थोपटे यांनीही नव्या सदस्यांचे स्वागत करत सांगितले की, सकल मराठा समाजाचा पाठिंबा मिळणं ही पक्षासाठी अभिमानाची बाब असून, त्यांच्या सहभागामुळे भोर तालुक्यातील विकासाच्या वाटचालीला नवसंजीवनी मिळेल.



### पक्षाची ताकद वाढणार..

**» भेलके आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या प्रवेशामुळे सकल मराठा समाजातील एकजूट भाजपच्या बाजूने दिसून आली आहे. भरतीय जनता पक्षाची ताकद वाढणार असून आगामी राजकीय घडामोडींवर या निर्णयाचा ठोस परिणाम होण्याची शक्यता जाणकारांकडून वर्तविली जात आहे.**